महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत प्रशासकीय
मंजूरी देण्यात आलेल्या पाणी पुरवठा व
मलनि:स्सारण योजनांना अनुदान वितरीत
करण्याबाबत. भोर नगर परिषद, जि. पुणे

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुनिअ २०१८/प्र.क्र.१३/पापु.२२
गोकुळदास तेजपाल हॉस्पिटल संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: १८ एप्रिल,२०१८

वाचा :

१. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. नापापु-२००८/प्र.क्र.१/पापु-२२,दि. २२.१०.२००८
२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.नापापु-२००८/प्र.क्र.१९८/पापु-२२, दि.२३.१२.२००८
३. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२०१३/प्र.क्र.४९२/पापु-२२,दि.१७.१.२०१४
४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे यांचे पत्र क्र. ताशा-२/सुनिअ भोर/२०५/२०१४, दि.१४.२.२०१४

प्रस्तावना :

शासन निर्णय, दि.२२ ऑक्टोबर, २००८ अन्वये नागरी पाणीपुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उदद्दीष्ट निर्धारीत करुन महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व नागरीकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सर्वव्यापक सुविधा निश्चितपणे उपलब्ध करुन देणे असा महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

२. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दि.१७.१.२०१४ अन्वये भोर शहर पाणी पुरवठा योजनेच्या एकूण रु. ७७,१३,०००/- किंमतीच्या सुधारणा कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे सदर योजनेस रु.६९.४२ लक्ष (९०%) शासन अनुदान अनुज्ञेय असुन नगर परिषदेची सहभागाची रक्कम रु.७.७१ लक्ष (१०%) आहे. मुख्याधिकारी, भोर नगर परिषद यांनी भोर नगर परिषदेची आर्थिक परिस्थिती सुयोग्य नसल्याने सहभागाची रक्कम जमा करण्यास विलंब झाला असल्याचे कळविले आहे. तसेच भोर नगर परिषदेकडे तांत्रिक अधिकारी उपलब्ध असल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची आवश्यकता नसल्याचे कळविले असुन त्यानुषंगाने योजनेची निव्वळ किंमत रु.७१,५२,३६५/- प्रमाणे स्वहिश्श्याची रक्कम रु.७,१५,२३६/- संबंधित बँक खात्यामध्ये जमा केली असुन योजनेस अनुज्ञेय असलेले अनुदान वितरीत करण्याची विनंती केली आहे. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे यांनी संदर्भ क्र. ४ अन्वये सदर योजनेच्या एकूण रु.७०,३१,८८५/- इतक्या निव्वळ किंमतीस तांत्रिक मान्यता दिली आहे. तांत्रिक मान्यतेप्रमाणे सदर योजनेस रु.६३,२८,६९६/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे. सदर बाबी विचारात घेता, शासन निर्णय, दिनांक

१७.१.२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या भोर शहर पाणी पुरवठा योजनेतील सुधारणा कामांना अनुज्ञेय अनुदानापैकी प्रथम हप्त्यापोटी रु.३१,६४,३४८/- अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दिनांक १७.१.२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या भोर शहर पाणी पुरवठा योजनेच्या सुधारणा कामांकरीता अनुज्ञेय अनुदानापैकी रु. ३१,६४,३४८/- (रुपये एकतीस लाख चौसष्ठ हजार तीनशे अठ्ठेचाळीस फक्त) इतके अनुदान पुढील विवरणानुसार वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपयांत)

शहराचे नाव	योजनेची एकूण किंमत	राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान (९०%)	नागरी संस्थेने निकषानूसार भरावयाची रक्कम (१०%)	नागरी संस्थेने भरलेली रक्कम	या अगोदर शासनाकडून वितरीत करण्यात आलेले अनुदान	राज्य शासनाकडून वितरीत करावयाचे अनुदान
१	२	३	४	५	६	७
भोर, जि.पुणे	७०,३१,८८५	६३,२८,६९६	७,०३,१८९	७,०३,१८९	--------	३१,६४,३४८
एकूण रुपये						**३१,६४,३४८**

२. सदर योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुज्ञेय होणाऱ्या सदर अनुदानावरील खर्च मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा १९२, स्थानिक संस्था, नगर पालिका इत्यादींना सहाय्य - राज्य योजना - (०२) (०२) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहायक अनुदान (२२१५ १६४७), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर लेखाशिर्षाखाली शासनाकडून उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून उक्त विवरणपत्रातील नमूद स्तंभ क्रमांक ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वितरीत करावे, तसेच अनुदानाच्या या वितरणाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

३. संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने योजनेसाठी स्वतंत्र लेखे ठेवावेत आणि योजनेचा प्रगती अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्रे नियमितपणे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत शासकीय अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत नागरी संस्थानी शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक- नापापु २००८/प्र.क्र.१/पापु-२२ दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ मधील तरतूदीचा अवलंब करणे आवश्यक राहील.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०४१८१२२८२०४४२८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sunil Jairam Tumram

Digitally signed by Sunil Jairam Tumram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873e6409c70b0a0219d717dd6767c9aec9dd2d61ecf0cc982e9e93ef57312675, cn=Sunil Jairam Tumram
Date: 2018.04.18 13:39:51 +05'30'

(सु.ज. तुमराम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

- महालेखापाल-१ मुंबई
- विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
- जिल्हाधिकारी, पुणे
- संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे
- जिल्हा प्रकल्प अधिकारी, (नगरपालिका) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
- जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
- मुख्याधिकारी, भोर नगर परिषद, जि. पुणे
- मा.मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
- वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- कक्ष अधिकारी, पापु.०४,पापु.२०,पापु.२१, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- निवडनस्ती, पापु-२२.